
International Multilingual Research Journal
Printing Area
ISSN 2394-5303
Special Issue, March-2018



# Greatest Philosopher : Dr.Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

ISSN: 2394 5303 | Factor 5.011(IIJIF) | International ...

15) विश्वरत्न डॉ. बाबासाहब आम्बेडकर और उनकी मानवता || 53
डॉ. अनिल अ. पाखरे, जि. अमरावती

16) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री || 56
नरेंद्र तुकडोजी आरेकर, जि. गडचिरोली

17) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास || 60
प्रा. डॉ. बालाजी लक्ष्मणराव शिंदे, जि. परभणी

18) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलितसाहित्य || 64
प्रा. ए. बी. भावसार, बाळापूर

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौध्द धम्म || 66
प्रा. धर्मदास विश्वनाथ घोडेस्वार, जि. चंद्रपूर

20) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला आणि कामगार सशक्तीकरणामध्ये योगदान || 70
प्रा. गौतम ए. शंभरकर, चंद्रपूर

21) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य निर्मिती || 73
प्रा.डॉ. अविनाश श. धोबे, जि. अमरावती

22) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदू कोडबिल || 77
प्रा.डॉ. हिराचंद चोखाजी वेस्कडे, जि.गडचिरोली

23) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रिपब्लिकन पक्ष || 80
डॉ. दयानंद ऊ. राऊत,जि.बुलडाणा

24) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण || 83
डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे, जि.परभणी

25) "सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक भूमिका." ... || 85
डॉ. आशा म. धारस्कर-भावसार, अकोला

26) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तनाविषयीचे विचार || 89
प्रा. सुधीर वि. बानुबाकोडे, जि. अमरावती

27) हिंदु कोड बिल--स्त्री मुक्तीचा जाहिरनामा || 93
प्रा. भारती दिगांबर रत्नपारखी, चंद्रपूर

28) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलविकासाचे धोरण || 95
प्रा. डॉ. संतोष चंपती हंकारे, जि. परभणी

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



24

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण

डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे
सहयोगी प्राध्यापक,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
ता. सोनपेठ जि.परभणी

**********

विसाव्या शतकातील क्रियाशीलनेते, थोरविचारवंत, भारतीय घटनेचे शिल्पकार, प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेव आंबेडकराचे लेखन मानवी जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करते. समाज, राजकारण, धर्म, अर्थकारण, शिक्षण, शेती, कामगार, इतिहास वाङ्मय, राज्यघटना या विविध क्षेत्रांवद्दल त्यांनी मुलगामीचिंतन करुन विचार मांडले. त्यांचे शैक्षणिक विचार अत्यंत महत्वपुर्ण आहेत. व्यक्ती व समाजात परिवर्तन घर्डावण्यासाठी ते शिक्षणाचे महत्व जाणुन घेते. त्यामुळे त्यांनी शिक्षण सामाजिकजाणिवा निर्माण करण्याचे महत्वाचे साधन मानले. शिक्षणामुळे माणसाला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव होते. शिक्षण माणसाला विचार देते, शिक्षणाचे महत्व पटवुन देताना ते म्हणतात की, "उपासमारी व शरीराचे पोषण कमी झाल्यास माणुस हीनवल घेऊन अल्पायुषीहोतो, तसेच शिक्षणाच्याअभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो" परंपरेने शिक्षण हे ब्राम्हण वर्गापुरतेच होते. इतर जातीनात्यांची मुभा नव्हती . त्यामुळे शोषित वर्गाचे शिक्षण झालं पाहिजे. हा त्यांचा आग्रहहोता. त्यासाठी शिक्षणाकडे वघण्याचा त्यांचा दृष्टिकोन विधायक आणि रचनात्मक होता.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे हवे :-**

प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा पुरस्कार त्यांनी केला होता. प्राथमिक शिक्षण राष्ट्रीय प्रगतीचा पाया होय, असे ते म्हणत. "प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्राच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार घेण्यास कैक शतके लागतील. म्हणुनच शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस असलेल्या जगातील सर्व देशांनीसक्तीचा कायदा करुन लोकांची निरक्षरता हद्दपार केली." लोकांच्या इच्छेवर जरहे प्राथमिक शिक्षण ठेवले तर त्याचा प्रसारहोण्यास कित्येक शतके लागतील त्यामुळे ते सक्तीचे करावे.

शिक्षणावरील ताबा आणि सक्तीचे तत्व अमलात आणण्या साठी सरकारचे त्यावर नियंत्रण असणे त्यांना आवश्यक वाटते. शिक्षणक्षेत्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र व स्वायत्त हवे असेल,तर या क्षेत्रावर व्यक्तिसत्ता असणे धोक्याचे आहे. हा त्यांनी दिलेला इशारा आज ही तंतोतंत लागु पडतो.

**शिक्षक हा सारथी :-**

शिक्षण हा मानवी जीवनाचा पायाभुत संस्कार आहे आणि शाळा हे संस्कारकेंद्र आहे. जे माणुस घडविते ते शिक्षण , असे त्यांचे मत होते. शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम शिक्षणाचा परिणामशील आणि चारित्र्याची निर्मिती करणे, असा असावा हा त्यांचा आग्रह होता. हा शिक्षणाचा परिणाम घडविण्याचे महत्तम कार्य शिक्षक करतो. 'शाळा' हे त्यांना संस्कारकेंद्र व नागरिक घडविण्याचा कारखाना वाटतो. या कारखान्यातुन होणारी निर्मिती जाणीपुर्वक, अर्थपूर्ण संस्कारलेली व आधुनिक असावी यावर त्यांचा कटाक्ष आहे. "शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्यातर्ता गोष्टनिराळी : पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करुन त्यांना समाजहितास योग्य असे वळण लावायचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरीक तयार करण्याचे कारखाने आहेत. अर्थात या कारखान्यात फोरमन जितका शाहना असेल तितका उत्तम माल कारखान्यातुन बाहेर पडणार आहे." शिक्षण हे पवित्र आहे आणि त्यांचे पवित्र्य राखण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी शिक्षकहा नि:पक्षपाती उदात्त आणि थोरमनाचा तसेच तो समाजहित दक्ष असावा असे ते म्हणत.

त्यांनी शिक्षकाबाबत मांडलेला हा विचार आजही ताजा आहे. त्याची मुल्यात्मकता आजही ढासळलेली नाही.

**अध्ययन, अध्यापन आणि संशोधनही प्राध्यापकाची निष्ठाहवी:-**

प्राथमिक शिक्षणाबरोबर महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचा विचार ही डॉ. आंबेडकरांनी केला आहे. प्रोफेसरांनी अध्ययन, अध्यापन व संशोधनाच्या कार्यात स्वत:ला वाहून घ्यावे, असे त्यांचे मत होते. त्यांनीइतर जबाबदाऱ्या अंगावर घ्याव्यात हे त्यांना मान्य नव्हते. "प्रोफेसरांनी अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या आणि अध्यापनाच्या कामी स्वत:ला इतके वाहुन घ्यावे की, आपल्या घराकडे बघायला त्यांना मुळी सवडच मिळता कामा नये.ते काम संपूर्णपणे त्यांच्या पत्नीवरच सोपविण्यात आले पाहिजे. प्रोफेसर लोकांनी भलती कामे अंगावर घेऊन आपल्यव जबाबदाऱ्यांचे ओझे उगाच वाढवित जावे, ही गोष्ट मला मान्य नाही. अध्यापन व अध्ययन यामध्ये संशोधनही आलेच. या तीन गोष्टीखेरीज प्रोफेसरांनी दुसरे कोणतेही काम करता नये." परंतु प्राध्यापकात परिश्रम करण्याची प्रवृत्ती आज विलुप्त होत आहे. हे पाहुनच खेद व्यक्त करतात.

त्यांनी प्राध्यपकाची गुणवत्ता, त्यांची अभ्यासाची शिस्त आणि मुख्य म्हणजे त्यांचे संशोधन कार्य यांचा ऊहापोह केला आहे.

**सहशिक्षणाचा पुरस्कार :-**

डॉ. आंबेडकर हे सहशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. स्त्री - पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण दिले पाहिजे. स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा या महाविद्यालये काढण्याची आवश्यकता नाही, असे त्यांचे मत होते. "स्त्रियांच्या शिक्षणासाठी निराळ्या शाळा, निराळी कॉलेज नकोत. स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबर एकत्र असले पाहिजे. "स्त्री - पुरुष सहशिक्षणामुळे स्त्रिया समानात निर्भिडपणे वावरु शकतील, असे त्यांना वाटेते. स्त्री - पुरुषांच्या सहशिक्षणास पुराणमतवादांचा होणारा विरोध हा पोथीनिष्ठ मनोवृत्तीचा व परिवर्तन विरोधी आहे, असेते नमूद करतात. स्त्रियांच्या सहवासात राहुन जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषाच्या सहवासात जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही यांची खबरदारी घेते त्यांना नीतिमान म्हटले पाहिजे, असेते प्रतिपादतात.

**अस्पृश्यांच्या शिक्षणाचा स्वतंत्र विचार : -**

अस्पृश्यांना शिक्षणाची दारे मोकळी करणे, हा त्यांच्या चळवळीचा महत्वाचा भाग होता. शिक्षणा शिवाय अस्पृश्यांचा विकास होणार नाही, हेते जाणुन होते. सर्ववंचीत समाजाला शिक्षणासंबंधी सवलतींची आणि विशेष सोयींची तरतुद त्यांनी अपेक्षिली आहे. प्राथमिक शिक्षणावरोबरच त्यांनी अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणाचा आग्रह धरला होता. अस्पृश्य वर्ग पिछाडीस राहिल्यामुळे त्यांना सवलती देणे त्यांना अपरिहार्य वाटते अस्पृश्यांना विशेष सवलती देऊन समान पातळीवर आणुनते समतेचा आग्रह धरतात.

अस्पृश्य वर्गाची प्रगती, विकास उच्च शिक्षणानेचहोईल असे त्यांना वाटते त्यामुळेत्यांनी ८ जुलै १९४५ ला 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' चीस्थापना केली. या संस्थेने२० जुलै १९४६ ला मुंबईत 'सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय, 'तर औरंगाबादमध्ये 'मिलिंद कला आणि विज्ञान महाविद्यालय' सुरु केले.

अस्पृश्यांच्या सामाजिक दुखण्यावर शिक्षण हे एकमेव अमोहा औषध असल्यामुळेत्यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणावर विशेष भर दिला अस्पृश्यांच्या विकासासाठी त्यांनी सवलतींचा आग्रहधरला. भारतीय संविधानाची निर्मिती करतानात्यांनीमागासवर्गीयांना विशेष सवलती प्राप्त करुन दिल्या. त्या संदर्भात 'भालचंद्र फडके म्हणतात, "भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून जसा बाबासाहेबांचा उल्लेख केला जातो. तसाच अस्पृश्यतेचे निर्मुलन करण्यास घटनात्मक तरतुदी करणारे आणि दलित जातिजमातींना राखीव जागा, सोयी- सवलतीदेऊन आपले अनेक वर्षांचे स्वप्न पुर्ण करणारे शिल्पकार म्हणून त्यांची या देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने नोंद करावी लागते."

डॉ. आंबेडकर हे स्वत: उत्तम प्राध्यापक होते. त्यांचे वाचन अफाट होते. त्यांचा वैयक्तिक ग्रंथ संग्रह [illegible] होता. या ग्रंथसंग्रहाचा त्यांना सार्थ अभिमान होता. ते म्हणत, "भारतातील कोणत्याही व्यक्तीकडे माझ्याइतक्या वाचनीय ग्रंथांचा संग्रह दाखवा मी त्यांना हा सारा ग्रंथसंभार अर्पण करेन" संशोधनाच्या क्षेत्रातही त्यांनी अधिक परिश्रम केले येते. त्यातूनच त्यांना [illegible] लाभली होती.

थोडक्यात शिक्षणाकडे बघण्याचा बाबासाहेबांचा दृष्टिकोन विधायक आणि रचनात्मक होता.

**संदर्भ ग्रंथ :**


१) मुकनायक - डॉ. गंगाधर पानतावणे

२) पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. गंगाधर पानतावणे

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - मा. फ. गांजरे

४) ४ दलितसाहित्य वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - भालचंद्र फडके


□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani